
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# नरमलेल्या मेटाने मागितली माफी

### झुकरबर्गची टिप्पणी अंगलट




◆ **नवी दिल्ली, १५ जानेवारी**

फेसबुकचा संस्थापक मार्क झुकरबर्गने देशातील निवडणुकीबाबत चुकीची माहिती देत केलेली टिप्पणी अंगलट आल्यावर 'मेटा'ने माफी मागितली. माहिती, तंत्रज्ञान आणि दूरसंचार प्रकरणांच्या संसदीय समितीचे अध्यक्ष निशिकांत दुबे यांनी 'एक्स'वर पोस्ट करीत ही माहिती दिली. मार्क झुकरबर्गने केलेल्या टिप्पणीसाठी संसदीय समिती मेटाला समन्स पाठविण्याची तयारी सुरू केली होती.

देशाची संसद आणि सरकारच्या पाठीशी १४० कोटी लोकांचा आशीर्वाद आणि विश्वास आहे. मेटाच्या भारतातील अधिकाऱ्यांनी चुकीसाठी शेवटी माफी मागितली, असे त्यांनी पोस्टमध्ये म्हटले आहे.

हा विजय भारताच्या सामान्य नागरिकांचा आहे. नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा नागरिकांनी पंतप्रधान करून जगातील एका देशाच्या सर्वांत बळकट नेतृत्वाचा परिचय दिला आहे. आता या मुद्द्यावर समितीची जबाबदारी संपली आहे. इतर विषयांवर आम्ही या समाज माध्यमाला बोलवू, असे त्यांनी पोस्टमध्ये म्हटले आहे.

फेसबुकचे संस्थापक आणि मेटाचे मुख्य कार्यकारी अधिकारी मार्क झुकरबर्ग यांनी ज्यो रोगनच्या पॉडकास्टमध्ये भारताबाबत चुकीची माहिती दिली होती. कोरोनाकाळात जगातील कित्येक देशांतील सरकार पराभूत झाले. त्यात भारताचाही समावेश आहे. कोरोना महामारीनंतर लोकांचा सरकारवरील विश्वास कमी झाल्याचे यावरून दिसून येते, असे त्यांनी पॉडकास्टमध्ये म्हटले होते.

२०२४ मध्ये झालेल्या पोटनिवडणुकांत रालोआला विजय मिळाल्याचा दावा झुकरबर्ग यांनी केला. झुकरबर्गच्या या वक्तव्यानंतर अनेक मंत्र्यांनी त्यांच्यावर टीका केली होती. माहिती व तंत्रज्ञान आणि दूरसंचार मंत्री अश्विनी वैष्णव यांनीही समाज माध्यमावरून त्याला प्रत्युत्तर दिले होते. जगातील सर्वांत मोठी लोकशाही असलेल्या भारतात २०२४ मध्ये झालेल्या निवडणुकीत ६४ कोटी नागरिक सहभागी झाले. देशातील लोकांनी नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील रालोआ सरकारवर विश्वास दाखवला, असे त्यांनी या पोस्टमध्ये म्हटले होते. (वृत्तसंस्था)



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत भारतीय हवाई दलाच्या ताफ्यात समाविष्ट करण्यात आलेल्या आयएनएस नीलगिरी, आयएनएस सुरत या दोन युद्धनौका आणि आयएनएस वाघशीर ही पाणबुडी



# मार्क झुकरबर्ग ३,६०० कर्मचाऱ्यांना काढणार

### मेटाचे एआयच्या दिशेने पाऊल

◆ **कॅलिफोर्निया, १५ जानेवारी**

फेसबुक, इन्स्टाग्राम आणि व्हॉट्सॲपची पेरेंट कंपनी मेटाने सुमारे ३,६०० कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकण्याची योजना आखली आहे. ज्या कर्मचाऱ्यांची असमाधानकारक कामगिरी आहे; अशांना मेटा कामावरून कमी करणार आहे.

मेटा आता कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात् एआय-संचालित सेवा आणि इमर्सिव्ह डिव्हाइसेसच्या दिशेने पुढे जात आहे. अशा परिस्थितीत मेटामधील हजारो कर्मचाऱ्यांना नोकरकपातीचा फटका बसणार आहे. दरम्यान, मेटाचे मुख्य कार्यकारी अधिकारी मार्क झुकरबर्ग यांनी ही नोकरकपात म्हणजे कामगिरी व्यवस्थापनाचा दर्जा वाढवणे आणि असमाधानकारक कामगिरी करणाऱ्यांना त्यातून लवकर बाहेर काढण्यासाठी उचललेले पाऊल असल्याचे म्हटले आहे.

या नोकरकपातीचा मेटाच्या सुमारे ५ टक्के कर्मचाऱ्यांवर परिणाम होईल. मेटाच्या कर्मचाऱ्यांची संख्या सप्टेंबरमध्ये ७२,४०० होती. अमेरिकेतील कर्मचाऱ्यांना या घडामोडीबाबत १० फेब्रुवारीपर्यंत अंतर्गत सूचना मिळण्याची शक्यता आहे, असे एका वृत्तात म्हटले आहे.

हे वर्ष खूप कठीण असेल आणि मला याची खात्री करायची आहे की, आमच्या टीममध्ये सर्वोत्तम लोक असतील, असे झुकरबर्ग यांनी म्हटले आहे. आम्ही साधारणपणे वर्षभरात अपेक्षित कामगिरी न करणाऱ्या लोकांना काढून टाकतो. आता आम्ही या फेरीत कामगिरीवर आधारित अधिक व्यापक नोकरकपात करणार आहोत, असेही त्यांनी नमूद केले. (वृत्तसंस्था)

# देशाच्या रक्षणासाठी भारतीय सैन्याचे समर्पण प्रेरणादायी

### राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडून सेना दिनी शुभेच्छा

◆ **नवी दिल्ली, १५ जानेवारी**

देशाच्या सार्वभौमत्वाचे रक्षण आणि राष्ट्रीय सुरक्षा अबाधित ठेवण्यासाठी भारतीय सैन्याची वचनबद्धता सर्वांसाठी प्रेरणादायी असल्याचे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी बुधवारी समाज माध्यम एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे.

सेना दिनानिमित्त भारतीय लष्करातील जवान, माजी सैनिक आणि त्यांच्या कुटुंबीयांनी शुभेच्छा देताना त्यांनी एक्सवर लिहिले की, मातृभूमीच्या सेवेसाठी तुम्ही दिलेल्या बलिदानांचे राष्ट्र नेहमीच स्मरण करेल. देशावर आलेले कुठलेही संकट असो, त्यावर मात करण्यासाठी भारतीय सैन्य नेहमीच पुढे राहिले आहे. देशावर आलेल्या नैसर्गिक आपत्तीत सैन्याने आपल्या कार्यातून करुणा, दयाळूपणा आणि मानवतावादी दृष्टिकोन सर्वांनी अनुभवला. तुमचे शौर्य आणि धैर्य भावी पिढ्यांसाठी नेहमीच प्रेरणादायी राहणार असल्याचे राष्ट्रपती मुर्मू यांनी म्हटले आहे.

**सैन्यासह कुटुंबीयांच्या कल्याणासाठी सरकार वचनबद्ध**

भारतीय लष्कर समर्पण, साहस आणि दृढनिश्चयाचे प्रतीक आहे. देशाच्या सीमांचे रक्षण करण्यासह नैसर्गिक आपत्तींमध्ये नागरिकांच्या मदतीसाठी त्यांनी नेहमीच पुढाकार घेतला असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे.

भारतीय लष्कराला सेना दिनाच्या शुभेच्छा देत मोदी यांनी एक्सवर लिहिलेल्या पोस्टमध्ये म्हटले की, सशस्त्र दलांच्या आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या कल्याणासाठी सरकार वचनबद्ध आहे. देशाच्या सुरक्षेसाठी सदैव तत्पर असलेल्या भारतीय सैन्याच्या अटल धैर्याला सलाम करतो तसेच कोट्यवधी भारतीयांच्या सुरक्षेसाठी बलिदान देणाऱ्या शूरवीरांना स्मरण करतो.

**सेना दिनाचे महत्त्व**

१५ जानेवारी १९४९ रोजी भारतातील शेवटचे ब्रिटिश कमांडर-इन-चिफ जनरल फ्रांसिस बुचर यांच्या जागी तत्कालीन लेफ्टनंट जनरल के. एम. करियप्पा यांनी भारतीय सैन्य दलाचे कमांडर-इन-चिफ म्हणून पदभार स्वीकारला. त्या प्रसंगाचे स्मरण म्हणून दरवर्षी १५ जानेवारीला सेना दिन साजरा केला जातो. (वृत्तसंस्था)

# पूजा खेडकरला तूर्तास अटक नाही

◆ **नवी दिल्ली, १५ जानेवारी**

भारतीय प्रशासकीय सेवेतील बडतर्फ प्रशिक्षणार्थी अधिकारी पूजा खेडकरविरुद्ध तूर्त कोणतीही कठोर कारवाई न करण्याचा आदेश सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी दिला तसेच पूजा खेडकरला १४ फेब्रुवारीपर्यंत अटकेपासून अंतरिम संरक्षणही दिले.

दिल्ली उच्च न्यायालयाच्या अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळण्याच्या आदेशाला आव्हान देणाऱ्या खेडकर यांच्या याचिकेवर न्या. बी. व्ही. नागरत्ना आणि न्या. सतीश शर्मा यांच्या न्यायासनाने दिल्ली सरकार आणि केंद्रीय लोकसेवा आयोगला नोटीस बजावली. या प्रकरणी पुढील सुनावणी १४ फेब्रुवारी रोजी होणार आहे. तोपर्यंत तिच्याविरुद्ध कोणतीही कठोर कारवाई केली जाणार नाही, असा आदेश न्यायालयाने दिला.

खेडकर हिच्यावर यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी इतर मागासवर्गीय आणि दिव्यांग आरक्षणाचा गैरवापर केल्याचा आरोप आहे. खेडकरने सर्वोच्च न्यायालयात असा युक्तिवाद केला की, माझी कोणतीही गुन्हेगारी पृष्ठभूमी नाही. मी दिव्यांग असलेली अविवाहित महिला आहे तसेच मला शारीरिक पडताळणीनंतर नियुक्त करण्यात आले होते. यामुळे अखिल भारतीय सेवा कायदा आणि नियमांनुसार मला संरक्षण मिळते. (वृत्तसंस्था)

# घटस्फोटाविना विभक्त राहणाऱ्या महिलेस गर्भपाताचा अधिकार

### पंजाब-हरयाणा हायकोर्टाचा महत्त्वाचा निर्णय

◆ **चंदीगड, १५ जानेवारी**

घटस्फोट न घेता पतीपासून वेगळी राहणारी महिला तिच्या पतीच्या संमतीशिवाय गर्भपात करण्याचा निर्णय घेऊ शकते, असे पंजाब-हरयाणा उच्च न्यायालयाने एका निकालात स्पष्ट केले.

एका महिलेने मोहालीतील रुग्णालयात तिच्या पतीच्या संमतीशिवाय गर्भपात करण्याची मागणी केली होती. गर्भधारणा होऊन १८ आठवडे झाले होते. रुग्णालयाने यास नकार दिला. यानंतर महिलेने गर्भपाताच्या परवानगीसाठी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. गर्भपातासाठी निर्धारित कालावधीपेक्षा जास्त नसल्यामुळे गर्भधारणा वैद्यकीयदृष्ट्या संपुष्टात आणता येते, असे तिने याचिकेत नमूद केले.

सुनावणीत याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी असा दावा केला की, कमी हुंडा आणल्याबद्दल महिलेचा तिच्या सासरच्या लोकांनी छळ केला, तिला वाईट वागणूक मिळाली. खाजगी क्षण गुप्तपणे रेकॉर्ड करण्यासाठी तिच्या बेडरूममध्ये दोनदा पोर्टेबल कॅमेरा बसवला होता. या क्रूरतेमुळे महिलेने वेगळे राहायला सुरुवात केली. मात्र, याच काळात तिला गर्भवती असल्याचे समजले.

**काय म्हणाले उच्च न्यायालय?**

उच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, एखाद्या महिलेला नको असलेली गर्भधारणा करण्यास भाग पाडले गेले, तर तिला मोठ्या शारीरिक आणि भावनिक आव्हानांना सामोरे जावे लागू शकते. आईच्या किंवा मुलांच्या आयुष्यातील इतर संधींचा पाठलाग करण्याच्या क्षमतेवर होतो. ही बाब लक्षात घेता, न्यायालयाने विवाहितेची याचिका मंजूर केली. याचिकाकर्ता विधवा किंवा घटस्फोटित श्रेणीत येत नसली तरी, तिने कायदेशीर घटस्फोट न घेता पतीपासून वेगळे राहण्याचा निर्णय घेतल्याने, ती गर्भधारणा संपुष्टात आणण्यास पात्र असल्याचेही न्यायालयाने नमूद केले. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### बांगलादेशात कंगनाच्या 'इमर्जन्सी'वर बंदी




**ढाका** : कंगना राणावतच्या आगामी 'इमर्जन्सी' या चित्रपटाशी संबंधित वाद सुरूच आहे. अनेक वादानंतर या चित्रपटाला भारतीय सेन्सॉर बोर्डाकडून प्रमाणपत्र मिळाले. हा चित्रपट १७ जानेवारीला प्रदर्शित होत आहे. प्रदर्शनाच्या अवघ्या दोन दिवस आधी बांगलादेशात या चित्रपटावर बंदी घालण्यात आली आहे. भारत आणि बांगलादेश यांच्यातील तणावपूर्ण परिस्थितीमुळे हा निर्णय घेण्यात आला. ही बंदी चित्रपटाच्या आशयामुळे कमी आणि दोन्ही देशांमधील राजकीय गतिशीलतेमुळे जास्त आहे.

### शिल्पा शिरोडकर 'बिग बॉस १८' मधून बाहेर

**मुंबई** : 'बिग बॉस १८' च्या फिनालेसाठी फक्त पाच दिवस बाकी आहेत आणि त्याच दरम्यान शिल्पा शिरोडकर शोमधून बाहेर झाली आहे. शिल्पा शिरोडकरवर शोमध्ये तिची जागा टिकवून ठेवण्यासाठी विवियन डिसेना आणि करणवीर मेहरा सारख्या मजबूत स्पर्धकांवर अवलंबून असल्याचा आरोप करण्यात आला. याशिवाय तिच्या कामगिरीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले होते. शो दरम्यान शिल्पाने अनेक वेळा टास्कमधील तिच्या कमकुवतपणाची कबुली दिली; परंतु तिच्या चाहत्यांना आशा होती की, ती निश्चितपणे अंतिम फेरीत पोहोचेल. चाहत पांडेलाही 'बिग बॉस १८'मधून बाहेर काढण्यात आले होते. चाहतला या शोच्या प्रबळ स्पर्धकांपैकी एक मानले जात होते आणि तिची हकालपट्टी देखील प्रेक्षकांसाठी एक मोठा धक्का होता.



### यामी गौतम साकारणार शाह बानोची भूमिका

**मुंबई** : आई झाल्यानंतर यामी गौतम पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर परतणार आहे. ही अभिनेत्री शाह बानोच्या जीवनावर आधारित चित्रपटात मुख्य भूमिकेत दिसणार आहे. पतीपासून घटस्फोट घेतल्यानंतर पोटगी मिळवण्यासाठी शाह बानोने कायदेशीर लढाई लढली होती. हे प्रकरण १९८५ मध्ये तिहेरी तलाक, महिला हक्क आणि मुस्लिम वैयक्तिक कायद्याशी संबंधित होते. सर्वोच्च न्यायालयाने शाह बानोच्या बाजूने दिलेला निर्णय देशभरात सामाजिक आणि कायदेशीर चर्चेचा विषय ठरला. तिहेरी तलाक प्रकरणात शाह बानोचे मोठे योगदान आहे. यामी गौतम या चित्रपटातून प्रेक्षकांना या प्रकरणाचे महत्त्व समजावून सांगणार आहे. शाह बानोची भूमिका साकारण्यासाठी यामी खूप मेहनत घेत असल्याचे सांगण्यात येत आहे. तिच्या कारकीर्दीतील ही आयकॉनिक भूमिका असेल. या नव्या आव्हानाबद्दल ती खूप उत्सुक आहे.






## आकडेवारी काय सांगते?

- लोकसंख्येनुसार विचार करायचा, तर कुंभ भाविकांची संख्या **रशियाच्या लोकसंख्येच्या** (१४४ दशलक्ष) **तिप्पट** आणि **पाकिस्तानच्या लोकसंख्येच्या जवळपास दोन पट** आहे.
- क्षेत्रफळानुसार पाहिले तर कुंभ क्षेत्र जगातील सर्वांत मोठ्या स्टेडियमपेक्षा १६० पट मोठे आहे. हे क्षेत्रफळ **चार हजार हेक्टर** आहे. सर्वांत मोठे नरेंद्र मोदी स्पोर्ट्स स्टेडियम २५ हेक्टरमध्ये आहे. उत्तर कोरियातील सर्वांत मोठे फूटबॉल स्टेडियम २१ हेक्टरमध्ये आहे.
- सोयी-सुविधांचा विचार केल्यास कुंभात **अमेरिकेपेक्षा ३०० पट अधिक शौचालये** आहेत. भाविकांसाठी **१.५ लाख सार्वजनिक शौचालये उपलब्ध** करण्यात आली आहेत.
- रेशनच्या वापराचा विचार केल्यास कुंभात दररोज होणारा तांदळाचा वापर सुवर्ण मंदिरातील लंगरपेक्षा ११० पटीने आणि पिठाचा वापर १६ पट जास्त आहे. तेथे दररोज **१० क्विंटल तांदूळ** आणि **१०० क्विंटल पीठ वापरले जाते.**
- सर्वांत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, खर्चाचा विचार करता कुंभ आयोजनाचा खर्च **राम मंदिराच्या उभारणीपेक्षा तिप्पट** आहे. राम मंदिराच्या उभारणीसाठी अंदाजे खर्च १८०० कोटी रुपये आहे. त्या तुलनेत **कुंभाचा खर्च ६,३८२ कोटी** रुपये आहे.
- उत्पन्नानुसार कुंभाची कमाई **आयपीएलपेक्षा दहा पट अधिक** आहे.

सोलापूर जिल्ह्याचे पहिले सहकार महर्षी
कै. गणपतराव धोंडीबा साठे
यांच्या १३७ व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!



अभिवादक
महात्मा फुले प्रतिष्ठान, माढा